# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ३०/१०/२०२४ (बुधवार) सकाळ**

---

**पो.स्टे. कन्हान हद्दीत तारसा रोडवर निलज जवळ ११ गोवंशाची तस्करी करणारे पिकअप वाहन पकडून, कन्हान डि.बी. पथकाने ११ गोवंशाना दिले जिवनदान, मौक्यावरून फरार दोन आरोपीतांना पकडून केले जेलबंद.**

दि. २६/१०/२०२४ चे २१.०० वा. ते दिनांक २७/१०/२०२४ च्या ०९.०० वा. दरम्यान फिर्यादी सपोनी राहुल चव्हान हे कर्तव्यावर हजर असता पोस्टे कन्हान येथील डि. बी पथकातील कर्मचारी हे कन्हान परीसरात रात्रगस्त पेट्रोलींग करीत असता सकाळी ०४.०० वाजे दरम्यान खात्रीशिर गोपनीय बातमी मिळाली की, एक चारचाकी वाहन पिकअप तारसा कडून कन्हान कडे येत आहे. सपोनी राहुल चव्हान यांनी डि. बी पथकासह सालवा पेट्रोल पंम्प जवळ ०५.०० वाजे नाकाबंदी केली असता सकाळी ५.२५ वाजता एक चारचाकी वाहन तारसा रोडकडून कन्हान कडे संशयास्पदरित्या येतांना दिसल्याने त्यास थांबण्याचा इशारा केला असता त्याला पोलीसाची चाहूल लागताच दोन्ही इसम वाहन रत्यावर सोडून शेतात पळून गेले. वाहनाची पाहणी केली असता सदरचे वाहन हे अशोक लेलॅड कंपनीचे मॉडेल बडा दोस्त पिकप वाहन क्र. MH 40 CT 5007 असे असून वाहनाच्या डाल्यामध्ये एकुण ११ गोवंश बैल जातीचे कतली करीता निर्दयतेने कोंबून, त्याचे चारापाण्याची सोय न करता , त्याचे चारही पाय एका लहान दोरीने मानेला बांधून एकावर एक ठेवून निर्दयतेने नेतांनी मिळून आले. ११ गोवंश बैल जातीचे किमंती प्रत्येकी २०,०००/—रू प्रमाणे एकुण २,२०,०००/रू चे व अशोक लेलॅड कंपनीचे मॉडेल बडा दोस्त पिकअप कि. ५,००,००० असा एकुण ७,२०,०००/रू चा मुद्देमाल घटनास्थळी जप्त करून पोना/७९४ महेश बिसने यांनी ध्यान फाउंडेशन गौशाला खरबी त.जि. भंडारा येथे दाखल करण्यात आले. अशा फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. कन्हान अप क्र. ७२४/२४ कलम ११(१),(ड),५(१),(२) प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम १९६०, सहकलम ९ महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम १९७६ अन्वये गुन्हा नोंद पुढील तपास सपोनी राहूल चव्हान हे करीत आहेत.

**गुन्हयाचा तपास व आरोपी शोध :—**

गुन्हा नोंद होताच ठाणेदार राजेद्र पाटील यांनी दोन्ही आरोपी फरार असल्याने त्यांना तात्काळ ताब्यात घेण्याचे आदेश दिले. स.पो.नी. राहूल चव्हान यांचे डि.बी पथकाच्या सहकार्याने वाहन क्रमाकावरून आरोपीतांची ओळख पटवून त्याना कामठी येथून १) अब्दुल हमीद हबीब शेख वय २८ वर्ष रा. कुरैशी नगर कामठी २) विक्की राजु वैरागडे वय ३० वर्ष रा. टिमकी पाचपावली नागपूर यांची गोपनीय माहीती काढून ताब्यात घेतले. त्यांना विश्वासात घेउन विचारपुस केली असता दोघांनी गून्हयाची कबुली दिली. दोन्ही आरोपीताना अटक केली असून पुढील तपास सुरू आहे.

## अवैधरीत्या धारदार शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

दि. २८/१०/२०२४ चे सकाळी ०९.०० वा. ते रात्री २१.०० वा. दरम्यान फिर्यादी हे कर्तव्यावर हजर असता डि.बी पथकास गोपनीय माहीती मिळाली की, गोडेगाव कॉलोनी मध्ये गोलु उर्फ फिंदु चौधरी हा हातात लोखंडी शस्त्र तलवार घेउन फिरत आहे. अशा मिळालेल्या माहिती वरून पोस्टे कन्हान येथील डी.बी पथक यांनी गोडेंगाव कॉलोनीत गोलु उर्फ फिदु यांच्या घरी जावून सदर इसमास त्याचे नाव गाव विचारले असता त्यानी आपले नाव रविप्रकाश उर्फ गोलु गुलाब चौधरी वय ३२ वर्ष रा. गोडेगाव कॉलोनी असे सांगितले. सदर इसमाच्या घराची घरझडती घेतली असता घराच्या आतील खोलीत लाकडी दिवाणाचे गादीखाली एका निळया रंगांचे कव्हर मध्ये एक लोखंडी पात्याची धारदार तलवार पितळी धातुची मुठ असलेली एकुण लांबी ३२ इंच, पात्याची लांबी २७.५ इंच, मुठेची लांबी ४.५ इंच, पात्याची रूंदी १ इंच असलेली किमती ८००/रू ची तलवार मिळून आली. सदर इसमास शस्त्र बाळगणे बाबत परवाना विचारले असता त्याने कोणताही परवाना नसल्याचे सांगितले. घटनास्थळी १२.२५ ते १३.०० वाजे दरम्यान तलवार जप्त करून सिल करण्यात आली. सदर इसमाचे कृत्य हे सध्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची आचार संहिते लागु असताना विनापरवाना अवैध शस्त्र बाळगणे असे होत असल्याने, सदर इसमावर सरतर्फे फिर्यादीच्या तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. कन्हान अप क. ७२७/२४ कलम ४, २५ भारतीय हत्यार कायदा सहकलम १३५ म.पो. का अन्वये गुन्हा नोंद केला असून पुढील तपास पोना अमोल नागरे हे करीत आहेत.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर